दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २७० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.३० डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# पनवेल शहराच्या सर्वांगिण विकासासाठी महापालिका सदैव कटीबद्ध : आयुक्त डॉ.गणेश देशमुख

मुंबई, नवीमुंबई प्रमाणेच झपाट्याने वाढणारे शहर म्हणून पनवेल नावारुपास येत आहे. पनवेलमध्ये साकारण्यात येत असलेले नवी आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भौगोलिक क्षेत्रफळाच्या आकाराने मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापेक्षाही मोठे आहे. त्यामुळेच पनवेल शहराचे नाव देशातील इतर महत्वाच्या शहराच्या यादीत लवकरच समाविष्ट होणार आहे. त्या अनुषंगाने पनवेलमधील आजूबाजूच्या सर्व परिसरात सिडको, एमएमआरडीए यासारख्या अनेक प्राधिकरणाची विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. यामध्ये रायगड जिल्ह्यातील पनवेल महापालिका ही आपली उत्कृष्ट कामगिरी बजावित आहे. पनवेल महापालिका स्थापन झाल्यानंतर सर्वाधिक काळ आयुक्तपदी असलेले डॉ.गणेश देशमुख यांच्या अधिपत्याखाली पनवेल शहराच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने अनेक कामे रस्ते काँक्रीटीकरण, वीज पुरवठा, पाणी पुरवठा, पथदिवे, महापालिका कार्यालय, प्रभाग कार्यालये, भूमी अंतर्गत गटारे, तलाव सुशोभिकरण, मलनिस्सारण अशी अनेक महत्वाची कामे सुरू असून एकूणच त्याच्या नियोजनासंदर्भात सरत्या वर्षाच्या पूर्वसंध्येला दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांनी आयुक्त डॉ.गणेश देशमुख यांची घेतलेली सविस्तर मुलाखत!



पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.गणेश देशमुख यांची मुलाखत घेताना दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार

## महापालिका स्थापनेनंतर शहरातील अंतर्गत व मुख्य रस्त्यांबाबत महापालिकेची भूमिका

पनवेल महापालिका अंतर्गत शहराला जोडणारे मुख्य रस्ते आणि शहरांतर्गत रस्ते असे दोन मुख्य टप्पे आहेत. यामध्ये पहिल्या टप्प्यातील शहराला जोडणारे मुख्य रस्ते यामध्ये रेल्वे स्टेशन रोड, वडाळे तलावा भोवतील रस्ता, ठाणा नाका ते साईनगर रस्ता असे मुख्य रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम पूर्णत्वास आले असून दुसऱ्या टप्प्यात शहरांतर्गत अरुंद रस्ते, जसे मिरची गल्ली, जयभारत नाका रोड, कापड गल्ली, भाजी मार्केट रोड या सारखे अरुंद रस्ते ज्या ठिकाणी आवश्यक तेथे रस्ता रुंदीकरण करून ते विकसित करण्यावर प्रशासन विचाराधिन आहे. तसेच तीन ते चार वर्षापूर्वी खड्ड्यांची जी समस्या पनवेल शहरामध्ये होती ती जवळजवळ आता राहिलेली नसून येत्या एक ते दिड वर्षात पनवेलमधील मुख्य रस्ते व अंतर्गत हे संपूर्णपणे सुस्थितीत आपणास पहावयास मिळतील.

## पाणी पुरवठा व मलनिस्सारण या विषयी महापालिकेचे धोरण

जुनी नगरपालिका क्षेत्र यामध्ये फक्त नवीन पनवेल व पनवेल असे क्षेत्र न राहता आता संपूर्ण खारघर, कामोठे, कळंबोली तसेच नव्याने समाविष्ट २९ गावे असा मोठा भाग पनवेल महानगरपालिकेच्या कक्षेत येत असल्याने पाण्याची मागणी आणि पुरवठा यामध्ये जरी तफावत असली तरी महापालिकेतील सर्व क्षेत्राला योग्य पाणी पुरवठा करण्यासाठी महापालिका सतत प्रयत्नशील आहे. त्यातूनच सद्यस्थितीत जुन पर्यंत पाणी पुरवठा सुरळीत रहावा यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे. त्यासाठी जरी २६ डिसेंबरपासून पनवेल शहरातील उंच जलकुंभ निहाय एक भाग आठवड्यातून एक दिवस बंद करण्यात येत असला तरी यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शहराला होणारा पाणी पुरवठा हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व देहरंग धरण मिळून एकत्रितपणे करण्यात येतो. यापुढे जावून भविष्यातील २५ ते ३० वर्षासाठीची उपाययोजना म्हणून भिरा डॅममधून पनवेल आणि नवी मुंबई महानगरपालिका अशा संयुक्त विद्यमाने एक मोठा प्रकल्प उभारता येईल का? या संदर्भात विचार सुरू आहे. अमृत योजनेंतर्गत ४२५ कोटी इतका भरीव निधी महापालिकेला प्राप्त झाला असून यामधून नव्याने समाविष्ट २९ गावांमध्ये सव्वा दोनशे कोटी रुपये खर्च करून भूमिगत मलनिस्सारण व्यवस्था त्याचप्रमाणे १५० कोटी रुपये खर्च करून ४३ पाण्याच्या टाक्या बांधून त्यातून पाणी पुरवठा करणारी यंत्रणा उभी करण्यात येत आहे. सद्यस्थितीत असलेला सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प हा जुनी नगरपालिका असताना उभारलेला आहे. त्यामुळे महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून त्याचे विस्तारीकरण करणे जरुरीचे होते. त्यासाठी राज्य शासनाकडून ५५ कोटी रुपये प्राप्त झाले असून त्या व्यतिरिक्त सांडपाणी प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या पाण्याचे पुर्नवापर करण्याचे देखील योजना असून हे निर्माण होणारे पाणी पनवेल परिसरात सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पांसाठी वापरण्यात येवू शकते.

## नवीन वर्षाच्या सुरूवातीलाच कोरोनाचे संकट पुन्हा उभे ठाकले असून त्यासाठी महापालिकेकडून प्रतिबंधात्मक व कोरोना नियंत्रणासाठी काय उपाययोजना असणार आहेत?

सुरूवातीपासूनच कोरोनाबाबतीत अत्यंत सावध भूमिका महापालिका प्रशासनाने घेतली असून सरकारकडून येणाऱ्या मार्गदर्शक सूचना व नागरिकांनी त्या पाळण्याचा केलेला अटोकाट प्रयत्न, तसेच उपलब्ध साधने या जोरावर आपण भयंकर अशा कोरोनाच्या तीन लाटांचा सामना करू शकलो. आता येणारी चौथी लाट एफ-बी सेव्हन हा व्हायरस सुद्धा तेवढा धोकादायक नसला तरी संपूर्ण यंत्रणा हायअलर्टवर असून पहिल्या टप्प्यात आपण महापालिकेची स्वतंत्र लॅब येत्या ३ ते ४ दिवसात सुरू करीत आहोत. त्याचप्रमाणे रुग्ण वाढीचे प्रमाण वाढल्यास घराघरात जावून तपासणी करण्याची सुरूवात केली जाईल. त्यामुळे रुग्णांपर्यंत लवकरात लवकर पोहचून त्याचा अधिक प्रसार होण्यास आळा बसेल. त्याचप्रमाणे कळंबोली येथील महानगरपालिकेचे ७२ खाटांचे हॉस्पिटल सुरू करण्याचे नियोजन देखील प्रशासनातर्फे सुरू आहे. तसेच अधिक गंभीर परिस्थितीत उद्भवल्यास ऑक्सिजनची गरज लागल्यास त्यासाठीही प्रशासन सज्ज असेल.

## स्वच्छता विषयक महापालिकेचे नियोजन

२०१६ ला महापालिका स्थापन झाल्यानंतर साधारणतः दोन वर्षानंतर कचऱ्याचे नियोजन हाती घेण्यात आले. यामध्ये २०१८ ला महापालिकेने कचरा निर्मुलनासाठी स्वतःची यंत्रणा निर्माण केली. जनतेने सुद्धा त्याला उत्तम प्रतिसाद दिला. आणि नागरिकांनी स्वच्छ भारत पोर्टलवर सुद्धा पनवेल शहरातील उत्तम सुधारलेल्या स्वच्छतेबाबत आपली प्रतिक्रिया दिलेल्या आहेत. स्वच्छ सर्वेक्षणासाठी पनवेल महापालिकेला राष्ट्रीय स्तरावरील मानांकन प्राप्त होवून २०२१ मध्ये राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते नवी दिल्ली येथे पनवेल महानगरपालिकेला गौरविण्यात आले. वाढत्या लोकसंख्येच्या दृष्टीने निर्माण होणारा कचरा उचलण्यासाठी स्वच्छ भारत मिशन मधील अनुदानातून कचरा वाहतुकीसाठी नवीन वाहने खरेदी करण्यात येणार आहेत. तसेच सद्यस्थितीत असलेला महापालिकेचा कचरा निर्मुलनाचा करार संपत असून नव्याने होणाऱ्या करारामध्ये अधिक सुधारणा करून शहरातील कचरा वाहतुकीसाठीच्या गाड्यांची संख्या वाढवून शहरातील संपूर्ण कचरा सकाळी १० ते १०.३० वाजेपर्यंत शहराबाहेर जाण्यासाठीच्या आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील.

## झोपडपट्टी पुर्नवसनाबाबत महापालिकेचे धोरण

संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रांतर्गत साधारणपणे साडेआठ हजार झोपड्यांची नोंदणी असून यामधील साडेचार हजार झोपड्या या सिडको प्रशासनाच्या भूखंडावरील आहेत. तर ४ हजार झोपड्या या महापालिकेच्या जागेवर वसलेल्या आहेत. यापैकी सिडकोच्या जागेवर असलेल्या झोपडपट्टी धारकांच्या पुर्नवसनासाठी त्यांना घरे बांधण्यासाठी सिडको प्रशासनाकडे जागेची मागणी करण्यात आलेली आहे. किंवा ज्या ठिकाणी सिडकोचे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सुरू असलेल्या सदनिकांच्या योजनेमध्ये त्यांना समाविष्ट करण्यात यावे याबद्दल सिडको प्रशासनाची चर्चा सुरू असून त्याबाबत लवकरच निर्णय होईल. त्यामुळे सिडकोचे भूखंड देखील मोकळे होण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे राहिलेल्या चार हजार झोपडपट्टी वासियांसाठी महानगरपालिकेने नियोजन केले असून त्यांना घरे बांधून देण्यासाठी एकूण ६ डीपीआर बनविले आहेत. यापैकी पहिल्या ४ डीपीआरसाठी निविदा प्राप्त झाल्या असून येत्या १० ते १५ दिवसांत त्यांना काम सुरू करण्याचा आदेश सुपूर्द करण्यात येईल. राहिलेल्या २ डीपीआरसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून त्यासाठी देखील निविदा प्राप्त झाल्यानंतर कामाची सुरूवात करण्यात येईल. आणि लवकरच पनवेल हे झोपडपट्टी मुक्त शहर होईल यात शंका नाही.

## पनवेलमध्ये सद्यस्थितीत सुरू असलेल्या भाजी मार्केट बाबत किंवा नवीन भाजी मार्केटकरिता काही उपाय योजना आहेत का?

भाजी मार्केट हा दैनंदिन नागरिकांच्या अगदी जिव्हाळ्याचा असणारा प्रश्न आहे. याबाबत प्रशासनाकडून कार्यवाही सुरू असून मुंबईमधील अद्ययावत अशा महात्मा फुले भाजी मंडईप्रमाणेच किंवा त्या स्तरावर अतिशय सुंदर, सुसज्ज, भव्यदिव्य असे भाजी मार्केट पनवेलमधील जनतेसाठी साधारणतः एक ते दिड वर्षाच्या कालावधीत उपलब्ध होईल.

## पनवेलची तलावांचे शहर अशी ओळख आहे, त्याच धर्तीवर तलाव सुशोभिकरणासाठी प्रशासनाकडून काय उपाय योजना आहेत?

तलावांचे सौंदर्यीकरण आणि संवर्धन करणे या भूमिकेवर प्रशासन ठाम आहे. पनवेल महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर मी जेव्हा या ठिकाणी रुजू झालो त्यावेळी पनवेलमधील जागृत नागरिक आणि लोकप्रतिनिधी यांनी पनवेल हे तलावांनी नटलेले समृद्ध शहर असून त्यांचे संवर्धन करणे गरजेचे असल्याचे मला निदर्शनास आणून दिले. आणि यानंतर पनवेल शहराच्या अत्यंत मध्यवर्ती ठिकाणी असलेले वडाळे तलाव हे नागरिकांचे आकर्षण ठरु शकते. म्हणूनच प्राधान्याने वडाळे तलाव सुशोभिकरणाचे काम सुरू केले. आज पनवेलमधील नागरिकांचे जॉगिंगसाठी, विरंगुळ्यासाठी वडाळे तलाव हे एक आवडीचे ठिकाण झालेले आहे. फक्त वडाळे तलावाचे सुशोभिकरण करून न थांबता आजूबाजूच्या सर्व परिसराचे सुशोभिकरण सुद्धा करण्यात आले. तलावाला जोडणाऱ्या सर्व मुख्य रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात आले. तलावाभोवती बसण्यासाठी विशिष्ट योजना करण्यात आली. यापुढे जावून संध्याकाळच्या वेळेस तेथे आकर्षक डिजीटल लाईटींग करण्याचा मानस असून येत्या जानेवारी महिन्यापर्यंत ते सुरू करण्यात येईल.

त्याचप्रमाणे तलावात निर्माण होणाऱ्या जलपर्णी, वनस्पती यामुळे पाणी खराब होण्याची शक्यता असल्याने त्यासाठी देखील नियोजन करून भविष्यात तलावाचे स्वच्छ व निर्मळ पाणी पनवेलवासियांना पहावयास मिळेल. त्याचबरोबर फक्त पनवेल शहरातील तलावांचे सुशोभिकरण करून न थांबता नवीन समाविष्ट विकसित नोडमधील खारघर येथील एका तलावाचे याच धर्तीवर सुशोभिकरणाचे काम सुरू केले असून ते देखील अंतिम टप्प्यात आलेले आहे. तसेच नव्याने महापालिका क्षेत्रात समाविष्ट झालेल्या ग्रामीण भागातील तलावांचे देखील पुर्नजीवन करण्याचे काम सुरू असून त्यातूनच पिसार्वे लेक सुशोभिकरणाचे काम प्रशासनाने हाती घेतलेले आहे. त्यासाठी १४ कोटी रुपये राज्य शासनाकडून प्राप्त झाले असून ते ही काम लवकरच सुरू करण्यात येईल. त्यामुळे पनवेल, नवीन पनवेल तसेच नव्याने समाविष्ट विकसित नोड खारघर, कामोठे, कळंबोली आणि ग्रामीण भाग असे मिळून सर्व समावेशक तलावांचे सौंदर्यीकरण, सुशोभिकरण आणि संवर्धनाचे काम प्रशासनाकडून सुरू आहे.

## पनवेल शहरातील मुलांना खेळण्यासाठी किंवा क्रिडांगणासाठी महापालिकेच्या माध्यमातून कोणत्या उपाययोजना करणार आहात?

पनवेल शहरातील मुलांसाठी नाविण्यपूर्ण स्पोर्टस् ॲकॅडमी निर्माण करण्यात येत आहे यासाठी सिडको प्रशासनाकडून ७ एकरचा भूखंड प्राप्त करून घेतलेला आहे. लवकरच येथे भव्यदिव्य स्पोर्टस् ॲकॅडमी स्थापन करण्यात येईल. प्रख्यात क्रिकेटपट्टू दिलीप वेंगसरकर यांच्या वेंगसरकर ॲकॅडमीची यासाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. या माध्यमातून दरवर्षी १०० मुलांना मोफत क्रिकेटचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या १०० मुलांची निवड प्रक्रिया आणि इतर बाबींसाठी वेंगसरकर ॲकॅडमी निर्णय घेणार असून यामध्ये महापालिकेचा कोणताही हस्तक्षेप राहणार नाही. यातील ५०% आरक्षण हे पनवेलमधील मुलांसाठी राखीव असून उर्वरित ५० टक्क्यामध्ये २५% हे रायगड जिल्ह्यातील तर राहिलेले २५ टक्के महाराष्ट्रातील मुलांसाठी राखीव असेल. अशा प्रकारचे नियोजन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यातूनच भविष्यात दर्जेदार खेळाडू निर्माण होवून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतासाठी खेळून पनवेलचे नाव नक्कीच मोठे करतील यात शंका नाही.

## महापालिकेतील कर्मचारी कमतरतेबद्दल महापालिकेचे भविष्यातील धोरण आणि उपाययोजना

पनवेल नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाल्यानंतर पनवेल, नवीन पनवेल, खारघर, कामोठे, कळंबोली आणि नव्याने समाविष्ट २९ गावे इतक्या क्षेत्रफळासाठी उपलब्ध असलेली कर्मचारी संख्या खुपच अपुरी आहे. पूर्वीच्या असलेल्या नगरपालिकेच्या स्टाफच्या आधारावर सध्याचे काम सुरू आहे. पनवेल महानगरपालिकेसाठी आवश्यक असणारा आकृतीबंध आपण शासनाकडे पाठवून तो मंजूर करून घेण्यात यश आले आहे. तसेच त्यासाठी असणारे सेवा प्रवेश नियम सुद्धा ऑक्टोबरमध्ये मंजूर झालेले आहे. त्यामुळे महापालिका कर्मचारी भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला असून राज्य सरकारकडून यासाठी दोन एजन्सी देण्यात आलेल्या आहेत. यापैकी एका एजन्सीची निवड करून येणाऱ्या ४ ते ५ महिन्यात भरती प्रक्रिया सुरू करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न राहील. यातून महापालिकेसाठी आवश्यक कर्मचारी संख्या निर्माण होवून महापालिका स्तरावरील कारभार सुरळीत चालण्यासाठी मदत होईल.

## पनवेलमधील नागरिकांच्या आरोग्य व दवाखाना विषयक महापालिकेचे धोरण

सध्यस्थितीत महापालिकेच्या देखरेखीखाली सहा आरोग्य केंद्र **(Urban Public Health Center)** सुरू असून सध्याची लोकसंख्या लक्षात घेता महापालिकेला साधारणतः १५ आरोग्य केंद्राची गरज आहे. त्यातील सहा आरोग्य केंद्र सुरू असून नव्याने नऊ आरोग्य केंद्र उभारण्याचा देखील प्रशासनाचा प्रयत्न सुरु आहे. त्यासाठी सिडको प्रशासनाकडून जागा खरेदीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. परंतु त्या प्रस्तावाच्या उत्तराची वाट न पाहता महापालिका ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होईल अशा ठिकाणी भाडेतत्वावर आरोग्य केंद्रांसाठी जागा घेवून ती सुरू करण्याचे नियोजन आहे.

त्यामुळे पनवेल शहरातील नागरिकांच्या सर्व स्तरावरील प्रश्नांसाठी महापालिका कार्यरत असून नजिकच्या काळात वरील हे सर्व प्रकल्प कार्यरत झाल्यानंतर पनवेल महानगरपालिका ही अत्यंत अद्ययावत व विकसित महानगरपालिका म्हणून आपल्याला पहायला मिळेल.

शब्दांकन
राकेश पितळे

# भावना - एक दुखणे!

भारत आता लवकरच 'काला आजार' या एकेकाळी भयंकर वाटणाऱ्या रोगावर विजय मिळविणार आहे. एकेकाळी देशातील ५० जिल्ह्यांना ग्रासून असणाऱ्या या विकाराचे रुग्ण आता केवळ दोन राज्यांतल्या चार जिल्ह्यांतच सापडतात. हा आपल्या सार्वजनिक वैद्यकसेवेचा मोठा विजय आहे. असाच विजय आपल्याला क्षयरोगावरही मिळवायचा आहे. त्यासाठी केंद्र सरकारने २०२५ हे साल मुक्रर केले आहे. म्हणजे, येती सार्वत्रिक निवडणूक झाल्यानंतर एका वर्षाने. देश म्हणून आपला हाही निर्धार यशस्वी व्हायला हवा. क्षय भारताचे अनेक अंगांनी नुकसान करतो. असाच आणखी एक निर्धार भारतीयांनी करायला हवा. तो म्हणजे, कोणत्याही छोट्यामोठ्या घटनांनी, विनोदांनी, जाहिरातींनी, चित्रपटांनी, नाटकांनी, कवितांनी किंवा शेरेबाजीने भावना दुखावल्या जाण्याचा विकार. अलीकडे तर तो फारच मोठ्या प्रमाणात बोकाळला आहे. जरा काही खुट्ट झाले की, कुणाच्या ना कुणाच्या भावना दुखावतात. मध्य प्रदेशाच्या उच्च न्यायालयाने अशी भावना दुखावल्याने गुदरण्यात आलेली फिर्याद निकाली काढली आहे. गरब्याचे चित्र दाखवून गर्भनिरोधकाची जाहिरात करणाऱ्या व्यापाऱ्यावरची ही फिर्याद उच्च न्यायालयाने रद्दबातल केली आहे. ही जाहिरात देणाऱ्याचा हेतू हा कोणाच्याही धार्मिक भावना दुखावणे हा नव्हता, तर आपल्या उत्पादनाची विक्री वाढवणे हा होता, याकडे न्यायमूर्ती सत्येंद्र कुमार सिंह यांनी निकालपत्रात लक्ष वेधले आहे. हे प्रकरण आजचे नाही. ते चार वर्षांपूर्वीचे आहे. २०१८ मध्ये नवरात्रीच्या काळात एका औषध कंपनीने जाहिरात करून 'दोन दिवस गर्भनिरोधक आणि प्रसूतिचाचणी संच मोफत दिले जातील,' असे जाहीर केले. ही जाहिरात देताना या कंपनीने सोबत गरबा खेळणाऱ्या जोडप्याचे चित्र छापले होते. ही जाहिरात पाहिल्यानंतर ती भावना दुखावणारी आहे, अशी फौजदारी तक्रारच एका व्यक्तीने पोलिसांकडे दिली. पोलिसांनी ती दाखल करून घेतली आणि खटला न्यायालयात उभा राहिला. यानंतर, या औषध विक्रेत्याने या फौजदारी तक्रारीच्या विरोधात स्वत:च उच्च न्यायालयात धाव घेतली आणि 'आपला हेतू केवळ उत्पादनाची माहिती पोहोचवणे आणि विक्री वाढवणे हा होता. कोणत्याही धर्माचा किंवा समुदायाचा अपमान व्हावा किंवा भावना दुखवाव्यात असा नव्हता,' असा युक्तिवाद केला. तो न्यायमूर्तींनी ग्राह्य मानला आणि या प्रकरणात कारवाई करता येणार नाही, असा निर्वाळा दिला. यातून काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. त्यातला पहिला म्हणजे, विशिष्ट सण किंवा उत्सव साजरे होत असताना गर्भनिरोधक विकले जातात का, अशा काही उत्सवांनंतर अवांच्छनीय गर्भधारणेचे प्रकार उजेडात येतात का? असे असेल तर त्या जाहिरातदाराकडून भावना दुखावल्या जाण्यापेक्षा उत्सवात मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा उचित वापर होण्याची काळजी करणे, हे अधिक महत्त्वाचे आहे. यात महत्त्व कशाला द्यायचे, याचा विवेक जर केला नाही तर केवळ पोलिसांकडे किंवा न्यायालयात धाव घेऊन वस्तुस्थिती कशी बदलणार? देशात अल्पसंख्यांक आणि बहुसंख्यांक अशा साऱ्याच समुदायांना भावना आहेत आणि त्या भावना जोवर कायद्यांचे किंवा राज्यघटनेतील मूलतत्त्वांचे उल्लंघन होत नाही, तोवर जपल्या जायला हव्यात, यात काहीच शंका नाही. किंबहुना, कुणी कुणाच्या भावना मुद्दाम दुखावणे, हे भारतातील कायदे आणि न्यायव्यवस्था खपवूनही घेत नाही. मात्र, काहीतरी किरकोळ कारण काढून जर भावना दुखावल्या गेल्या तर किंवा तसा बहाणा केला गेला तर समाजातील सारा संवादच संपून जाईल. साऱ्या व्यवहारांमध्ये शुष्कता येईल. काही काळापूर्वी देवदेवतांच्या मंदिरांना किंवा देवांनाही विशिष्ट विशेषणांनी ओळखले जावे का आणि तसे केले तर भावना दुखावतात का, असा प्रश्न निर्माण झाला होता. खरेतर, अशी नावे हा आपल्या लोकसंस्कृतीच्या प्रवाहाचाच भाग असतो. तो काही देवांचा अपमान करणारा नसतो. हिंदू धर्म आणि भारतीय संस्कृती तर याबाबत उदार व सहिष्णू आहे. मराठीतील संतवाङ्मय चाळले तरी भक्त देवांशी कोणत्या भाषेत बोलू शकतो, याचा प्रत्यय येईल. गरबा हा खेळ ज्या देवाशी संबंधित आहे; तो कृष्ण तर सर्वच बाबतीत उदारचरित आहे. उद्या त्याला 'माखनचोर' म्हटल्याने जर काहींच्या भावना दुखू लागल्या तर काय करायचे? गरबा खेळाचे चित्र आणि त्यासोबत असणारी गर्भनिरोधकाची जाहिरात; यातून निर्देश होतच असेल तर गरबा खेळणाऱ्या भक्तांच्या वर्तनाचा होतो. त्यात ईश्वराचा, धर्माचा किंवा संस्कृतीचा काय संबंध आहे? अशा तक्रारी आणि असे खटले होतात; तेव्हा स्वाभाविकच समाजाच्या अभिव्यक्तीसमोर एक अदृश्य भिंत उभी राहते. उद्या आपण असे काही बोललो किंवा लिहिले तर आपल्यावरही खटला होईल, अशी अनामिक भीती दाटून राहते. असे भयाचे वातावरण निर्माण करणे, हाच अशा तक्रारींचा उद्देश असतो. उच्च न्यायालयाने ही तक्रार फेटाळून अतिहळव्या आणि भावनाशील तक्रारखोरांना योग्य जागा दाखविली आहे.

# रायगड जिल्ह्यासाठी ऐतिहासिक घटना, पहिला बाल दिक्षार्थी घेतोय संन्यास

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत शहरातील महावीर पेठे मध्ये राहणारे योगेश मांगीलाल ओसवाल यांचा सुपुत्र कु. कलश ओसवाल हा चौदाव्या वर्षी दीक्षा घेऊन संन्यास स्वीकारणार आहे. त्याची वरघोडा मिरवणूक कर्जत शहरातून वाजत - गाजत काढून समारंभ ठिकाणी नेली. कलश हा रायगड जिल्ह्यातील पहिला बाल दिक्षार्थी ठरणार आहे. या ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार म्हणून विविध राज्यातून भाविक उपस्थित राहिले असून आज ( २९ डिसेंबर ) दीक्षा समारंभ पूर्ण होणार आहे.

शहरातील सामाजिक कार्यकर्ते स्वर्गीय मांगीलाल भुरमल ओसवाल यांचा नातू कलश याला लहानपणापासूनच परमार्थाची आवड होती. त्यातच ते राहतात त्याच्या शेजारीच 'पुण्योदय' हे जैन साध्वी व जैन मुनींचे विश्रांती स्थान आहे. तसेच निवसस्थाना समोरच जैन मंदिर असल्याने त्याला आपणही असेच जैन मुनी बनावे असे वाटू लागले आणि शिक्षणाकडे त्याचे दुर्लक्ष होऊ लागले. त्यानंतर तो जेथे जैन मुनी वास्तव्यात असतील तेथे जाऊ लागला. कालांतराने तो त्यांच्या सहवासात राहू लागला. त्यामुळे कलशच्या कुटुंबीयांनी मोठ्या जड अंतकरणाने त्याला दीक्षा देण्याची परवानगी दिली आणि २९ डिसेंबर २०२२ ही तारीख दीक्षा समारंभासाठी निश्चित करण्यात आली.

त्याची मिरवणूक काढण्यात आली. रथ, तसेच त्याला बसण्यासाठी अगदी उंच असे आसन तयार करण्यात आले. ही मिरवणूक जैन मंदिरापासून निघून महावीर पेठेतून मुख्य बाजारपेठ मार्गे श्रीराम पूल आणि नंतर दीक्षा समारंभ आयोजित केलेल्या ठिकाणी वाजत - गाजत नेण्यात आली. या मिरवणुकीच्या वेळी कलशने पैसे, कपडे, मौल्यवान वस्तू उधळून त्यांचा त्याग केला. उद्या आचार्य श्री अजीतरत्न सूरीश्वरजी महाराज कलश ला दीक्षा देणार आहेत. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर विचारात, ' संन्यास कुणीही घेऊ शकतो बालक - बालिका, युवक - युवती, वृद्ध किंवा लग्न झालेले सुद्धा घेऊ शकतो. मात्र त्यानंतर त्यांनी सर्व काही त्याग करून सन्यासाश्रम प्रामाणिकपणे पार पाडला पाहिजे.' असे स्पष्ट केले.

याप्रसंगी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, जयंतीलाल परमार, रणजीत जैन, मोहन ओसवाल, साजन ओसवाल, किरण परमार, पंकज ओसवाल, मंगल परमार, हिम्मतलाल ओसवाल, योगेश ओसवाल, चंपालाल ओसवाल, माजी नगराध्यक्ष धनंजय चाचड, पारस जैन, जितेंद्र ओसवाल, सुनील सोनी आदींसह असंख्य जैन धर्मीय व नागरिक उपस्थित होते.

# कालवा सफाई केली कचरागाळ बाहेर काढला, रस्ते उखडले त्याच्या नियोजनाचे काय?

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



कालवा सफाई करताना कालव्यातुन गाळ कचरा बाहेर काढला आणि कालव्याच्याच कडेला रचला, आता ही घाण कचरा कधी उचलणार ? असा सवाल ऐरणीवर आला आहे. तसेच या कामासाठी आणलेले जेसीबी व कोबल्को मशिन रणगाडा यंत्र डांबरी रस्त्यावरुन नेल्याने अनेक ठिकाणी रस्ते अक्षरशहा उखडलेत. याबाबत संबंधित जेसिबी, कोबल्को रणगाडा मशिन ऑपरेटर यांना या रस्त्याचे नुकसान निदर्शनात आणुन देत जाब विचारला असता त्यांनी नगरपंचायतीला कळविणार आहोत असे उत्तर दिले आहे. याबाबत माणगांव नगरीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांचेश फोन वरुन संपर्क करुन माहीती दिली असता त्यांनी रस्ता नुकसानीची येथे येऊन प्रत्यक्ष पाहणी केली आहे.

माणगांव नगरपंचायत हद्दीत ठिकठिकाणी रस्ते उखडलेत यामध्ये जीवन प्राधिकरनकडे जाणारा वाटर सप्लाय रोड जलशुध्दी केंद्रातून बाहेर पडताना प्रवेशद्वारा जवळच रस्त्याचे नुकसान झाले. एकतर या रस्त्याचे डांबरीकरन येथिल जनतेची अनेक वर्षाची मागणी व प्रतिक्षेनंतर पूर्तता झाली होती आणि रस्ता या ठिकाणी उखडला आहे. याची संबंधित पाटबंधारे विभागाने दखल घेत तात्काळ डागडुजी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. आता कालव्याला पाणीही आले आहे. यासाठी योग्यती उपाय योजना त्यांनी करावी अशी जनतेची मागणी आहे.

# श्रीवर्धन तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी अनिल भुसाणे

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**



श्रीवर्धन तालुका शिक्षण प्रसारक आणि सहाय्यक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा आज दुपारी दोन-तीस वाजता र.ना. राऊत विद्यालय श्रीवर्धन या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये पुढील पाच वर्षासाठी अध्यक्ष व कमिटी यांची नेमणूक करण्याची होती.

श्रीवर्धन तालुका शिक्षण प्रसारक आणि सहाय्यक मंडळाची स्थापना श्रीवर्धन मतदारसंघाचे माजी आमदार दिवंगत रवींद्र राऊत यांनी केली होती. त्यावेळी रवींद्र राऊत यांच्यासोबत कार्यवाह म्हणून अनिल भुसाणे यांनी अनेक वर्ष काम केले होते. मागील वीस वर्षापासून अनिल भुसाणे हे श्रीवर्धन तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम पाहत होते. मात्र यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभा सुरू झाल्यानंतर सर्व सदस्यांनी एकमुखी आवाज करून अनिल भुसाणे यांची बिनविरोध निवड जाहीर केली. त्याचप्रमाणे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पोलेकर व कार्यवाह योगेश गंद्रे यांची निवड करण्यात आली आहे. या सभेमध्ये मागील वेळेस असलेलेच संचालक मंडळ पुढील पाच वर्षासाठी कायम ठेवण्यात आले आहे. अनिल भुसाणे यांची अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यामुळे श्रीवर्धन शहरातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# मुरूड तहसिल कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरूडच्या तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन नुकताच साजरा करण्यात आला. नायब तहसीलदार गोविंद कोटंबे, पुरवठा शाखेचे सचिन राजे रास्त भाव धान्य दुकान संघटनेचे अध्यक्ष गिरीष साळी , अजित कासार, सचिन कासेकर यांसह ग्राहकवर्ग यावेळी उपस्थित होता. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. महसूल नायब तहसीलदार गोविंद कोटंबे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून का साजरा केला जातो.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशील हे श्री.अमोल धनसिंग निंबाळकर व सौ.मनाली अमोल निंबाळकर त्यंच्या मालकीची व ताबेकब्जातील सदनिका क्र.२००३, विसावा मजला, साई वर्ल्ड सिटी, क्र.१, अंदाजे क्षेत्रफळ ६१.४५२ चौ.मी. कारपेट, सर्वे क्र.९५/१, ९५/२, ९५/३/अ, ९८/१, ९८/२, ९८/३, ९८/४ऐ, ९८/४/बी/१, ९८/४/बी/२, ९८/५, ९८/७/के, ९८/८, ९८/९, ९८/१०/अे, ९८/१०/बी, ९९, १०१/३, १०१/४/अे, १०१/४/बी, १०१/४/सी, १०१/५, १०१/६, १०१/७, १०१/८/अे, १०१/८/बी, १०१/९, १०१/१०/अे, १०१/१०/बी, १०२, १०३/१, १०३/२, १०३/३, १०३/४, ११०/१०, ११०/११, कोळखे गाव, ता.पनवेल, जि.रायगड (यापुढे त्या सदनिकेला संक्षिप्तपणे सदरहू मालमत्ता म्हणून संबोधले जाईल.)

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझे अशिल यांना त्यांच्या वकीलातर्फे कायदेशीर नोटीस दि.३० डिसेंबर २०२२ द्वारे सौ.नुरजाहान अरशद सय्यद साठे करारनामा दि.११ फेब्रुवारी २०२२ रोजी झालेला करारनामा, दुय्यम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयात दस्त क्र.पवल १/१६७४/२०२२ दि.११ फेब्रुवारी २०२२ रोजी नोंदणीकृत झालेला माझे अशिलांनी रद्दबातल केला आहे. तसेच पुढे सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझ्या अशिल यांच्या मालकीची सदरहू मालमत्ता बाबत सौ.नुरजाहान अरशद सय्यद यांनी कुठल्याही प्रकारचा हिंतसंबंध व अधिकार याबाबत कोणा त्रयस्थ व्यक्तिसमवेत समझोता करार, साठे करार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसा हक्क, ट्रस्ट, न्यास, ताबा, कुळ, भाडेपट्टा, लियन, त्याच्या लग्नातून उदभवणा-या त्याच्या पत्नीचा कुठल्याही प्रकारे पोडगी/इतर अधिकार किंवा इतर बाबी द्वारे हरकत किंवा दावा असेल तर त्यांना विनंती करण्यात येते की तशा प्रकारची हरकत किंवा दावा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून किंवा नोटीस प्रसिद्ध पूर्व केले असतील तर ते सर्व प्रकारचे हक्क व अधिकार असल्यास बाद किंवा संपुष्टात आला आहे. माझे आशिल त्यांच्या सौ.नुरजाहान अरशद सय्यद यांच्या कुठल्याही प्रकारेचे व्यवहारांस जबाबदार राहणार नाही.

**सही/-**

**अ‍ॅड. मंगेश मधुकर चव्हाण**
**शॉप क्र. सी - ३१३, पहिला मजला, वाशी प्लाझा, प्लॉट क्र. ८० - ८१, सेक्टर - १७, एच.डी.एफ.सी. बँक, वाशी, नवी मुंबई ४००७०३**
**९८२०४२१३३९**


# मनसे चषक क्रिकेट स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पेण तालुका अध्यक्ष रुपेश पाटील यांच्या तर्फे पेण शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमवर तीन दिवसीय भव्य दिव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेला राजकीय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, डॉक्टर, वकील, पोलीस, पत्रकार, उद्योजक, शिक्षक, कलाकार, गायक आदी सर्वच क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून या स्पर्धेला शुभेच्छा दिल्या. सदर स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील हाशिवरे संघ १ लाख रुपयेचा मानकरी ठरला. या क्रिकेट स्पर्धेत पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील एकूण २४ संघांनी सहभाग घेतला होता.

प्रत्येक संघांनी उत्कृष्ट खेळी केली. यावेळी अलिबाग तालुक्यातील हाशिवरे संघाने प्रथम क्रमांक, पेण तालुक्यातील कालभैरव कोपर संघाने द्वितीय क्रमांक तर मोरया बोरगाव संघ तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला. तसेच उत्कृष्ट फलंदाज प्रतिकेश मोकल (कोपर) व उत्कृष्ट गोलंदाज मंथन डाकी (हाशिवरे) जाहीर करण्यात आले. तसेच मालिकावीर प्रफुल्ल पाटील (हाशिवरे) यास गौरविण्यात आले. प्रेक्षकांमधून अक्षय पाटील याला लकी ड्रॉ आय फोन वॉच मिळाला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस नोटीसीच्या माध्यमातून कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.अभिजीत मारुती शिंत्रे यांच्या आईच्या नावे (सौ. विमल मारुती शिंत्रे) असलेली खालील वर्णनाची मिळकत साठेकरार (Agreement for Sale) दस्त क्रमांक प.व.ल. ३३१४/१९९४ दिनांक ३१/१२/१९९४ रोजी दुय्यम निबंधक पनवेल यांचेकडे नोंद केलेला आहे. सदरचे मुळ दस्त वडिलांच्या मृत्यूनंतर घराचे काम चालू असल्यामुळे सामानाची उलथा-पालथ झाल्यामुळे सदरचे मुळ दस्त गहाळ झाले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

फ्लॅट नं.००२, तळ माळा, अम्रपाली को.ऑ.हौ.सोसा.लि., प्लॉट नं.१८, सेक्टर-१३, नवीन पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड. क्षेत्रफळ ३९६ चौ.फूट अप्रॉक्स, कारपेट एरिया

सदरची मिळकत ही वरील मालकाची निर्वेध मालकी हक्काच्या प्रत्यक्ष ताबेकब्जात आहे.

तरी वर वर्णन केलेली मिळकतीबाबत मुळ दस्त क्रमांक प.व.ल. ३३१४/१९९४ दिनांक ३१/१२/१९९४ कोणास भेटले असेल तर तो वा इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहिवाट, गहाण, बक्षिसपत्र, चार्ज, लीज, अ‍ॅटॅचमेंट, लीन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार खालील दिलेल्या पत्यावर कळविणे.

दि.२९/१२/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही/-**

**अ‍ॅड.किशोर टोम्पे**
**रुम नं.२१०, ए विंग, सिम्फोनी को.हौ. सोसायटी, प्लॉट नं.३१, सेक्टर-३, नवीन पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८२०३७३८२८**



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**पनवेल (भिंगारी) ४१०२०६**

Tel : 27452778 Mail : panvel.ee@mahapwd.gov.in Website : http://www.mahapwd.gov.in

**ई-निविदा सूचना क्र.६७ सन २०२२-२३**
**(ऑनलाईन निविदा)**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल**

खालील कामाच्या बी-१ कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, पनवेल दूरध्वनी / फॅक्स क्रमांक : ०२२-२७५२७७८ / ०२२-२७४६७४४० महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत (पंजीकृत) कंत्राटदारांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमूदा कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पनवेल यांच्या संकेतस्थळावर दि.२६/१२/२०२२ सकाळी १०.०० ते दि.०२/०१/२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत ऑनलाईन (www.mahapwd.com) वर उपलब्ध आहे. कार्यकारी अभियंता हे ठेकेदाराने भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा ऑफलाईन पद्धतीने दि.०२/०१/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत स्वीकारतील आणि दि.०४/०१/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु.लक्ष) | इसारा रक्कम (रुपये) | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत जीएसटी धरुन | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे जाबुळवाडी ग्रा.पं.वारे येथे रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे, ता.कर्जत, जि.रायगड | ४.४७ | ५०००/- | वर्ग-८ अ वरील | ५९०/- | ०६ महिने |
| २ | मोठी जुई येथे अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे, ता.उरण, जि.रायगड | ७.०८ | ८०००/- | वर्ग-८ अ वरील | ५९०/- | ०६ महिने |
| ३ | मौजे : आकुर्ली, ता.पनवेल, जि.रायगड येथील रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे | ६.९१ | ७०००/- | वर्ग-८ अ वरील | ५९०/- | ०६ महिने |
| ४ | विचुंबे शिवकर रस्ता बांधकाम करणे, ता.पनवेल, जि.रायगड | ५.०३ | ६०००/- | वर्ग-८ अ वरील | ५९०/- | ०६ महिने |

१) ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ३०/१२/२०२३ ते दिनांक ०३/०१/२०२३
२) ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) :- दिनांक ०५/०१/२०२३

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, पनवेल यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

१) तपशिलवार निविदा सूचना कार्यकारी अभियंता व अधिक्षक अभियंता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल. तसेच कार्यकारी अभियंता यांनी विनंती केल्यास निविदा सुचनेची प्रत विनामुल्य मिळू शकेल.
२) कोरी निविदा संच विक्री https://www.mahapwd.com या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध आहे.
३) इतर अटी व शर्ती ई-निविदामध्ये पहावयास मिळतील. सदर कामाची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहे.
४) सर्व पात्र / इच्छुक कारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या https://www.mahapwd.com या Portal वर enrolled करणे आवश्यक आहे.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, पनवेल**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल, पिनकोड-४१०२०६**
E-Mail : panvel.ee@mahapwd.gov.in
**दुरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०**
**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र.६७ (ई-निविदा) सन २०२२-२३ (फेर निविदा क्र.३)**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र.०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरिता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) मागविण्यात येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

टिप :- या निविदेमध्ये एकूण ०४ कामे समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीडप्रिपरेशन दि.३०/१२/२०२२ सकाळी १०.०० ते दि.०३/०१/२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/---
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :-

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विभाग, पनवेल**

जिमाका/राअ/जाहि/१६४/२०२२-२३


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## लाखो रुपये किमतीच्या पंपाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लाखो रुपये किमतीच्या पंपाची चोरी गोडाऊन मधून झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

शहरातील मार्केटयार्ड या ठिकाणी असलेल्या काशिनाथ कल्याणकर यांच्या गोडाऊन मधून वेगवेळ्या कंपनीचे पंप ज्याची किंमत लाखो रुपये इतकी आहे हे चोरीस गेल्यामुळे याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## नववर्षाच्या स्वागतासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी पार्किंग सुविधा पुरवावी : मंगेश दांडेकर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड जंजिरा पर्यटनात नववर्षाच्या स्वागतासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी पार्किंग सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.याबाबत नागरिक नात्याने शक्य ती मदत करण्यास तयार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी मुरुड पोलीसांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

सध्या ख्रिसमस व ३१ डिसेंबर, नववर्षाचे स्वागताच्या निमित्ताने मुरुडला हजारो पर्यटक येत आहेत. परंतू वाहन पार्किंगची कोणतीही सोय नसल्याने पुरता बोजवारा उडाला असून पर्यटक व स्थानिकांना प्रचंड त्रास होत आहे. किंबहुना अनेकदा वादाचे प्रसंग उद्ववत आहेत. शिवाय शहरातील अनेक जेष्ट नागरीक नित्यनेमाने समुद्रावर चालण्यास जातात. काल दि. २७/१२/२०२२ रोजी सुमारे ४० ते ५० शालेय सहलीच्या बसेस आल्या होत्या.

त्या समुद्र किनारी मुख्य रस्त्यावर पार्क केल्या होत्या, त्यामुळे बाजूने छोटया चारचाकी गाडया जाण्यास खुप अडचणीचे होत होते. त्यामुळे अनेक वाद निर्माण झाले. या संदर्भात तात्पुरती पार्किंगची उपाययोजना काय करता येईल याबाबत आपण योग्य तो विचारविनिमय करावा. याविषयी आम्ही नागरीक म्हणून आपणांस जी शक्य होईल ती मदत करण्यास तयार आहोत.असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री.नरेश दत्तात्रेय हुदार रा.नांदगांव, ता.पनवेल, जि.रायगड खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक १) नागेश नरेंद्र लोखंडे रा.गाव मालाठे, तालुका : तळा, जि.रायगड २) विनायक दत्तात्रेय रसाळ रा.बोरघर, हवेली, ता.तळा, जि.रायगड यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी कराराने घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : मालाठे, तालुका : तळा, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी |
|---|---|---|---|
| १ | १७४ | ०-४८-०० | ०.२४ |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री देणगी, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रासहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा विकसन करार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२९/१२/२०२२

सही/-
**ॲड.रोशनी कुंडलिक खुटले**
**शॉप नं.१, गणेश टॉवर, मोठा खांदा, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२९१२१०००१**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : वेश्वी, ता.उरण, जि.रायगड येथील खालील नमूद जमीन मिळकतीबाबत माझे अशिल श्रीमती.लिलाबाई शाम पाटील, रा.जांभूळपाडा, पो.जासई ता.उरण, जि.रायगड यांचे ताबेकब्जातील व वहिवाटीतील आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| वेश्वी | ४८ | २/ब | ०-२०-२० पो.ख. ०-०१-५० | २.१४ |

वरील नमूद मिळकत ही सातबारा सदरी कै.गजानन काशिनाथ पाटील यांचे वारस १) विजय गजानन पाटील, २) प्रकाश गजानन पाटील, ३) राजेंद्र गजानन पाटील, ४) मदन गजानन पाटील, ५) गणेश गजानन पाटील व ६) वसंत काशिनाथ पाटील ह्यांचे नावाची सदरहू मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटमध्ये नावे मालक सदरी असल्याचा गैरफायदा घेवून सदरहू वर नमूद मिळकती त्रयस्थ इसमांना विकून टाकण्याच्या प्रयत्नात आहेत. अगर अन्य मार्गानी तबदील करण्याच्या प्रयत्नात आहेत. असे वर नमूद माझे अशिलांना खात्रीने आढळून आलेले आहे. तरी तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहू वर नमूद जमीन मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत असून माझे अशिल श्रीमती.लिलाबाई शाम पाटील ह्यांचे मालकी हक्कात, ताबेकब्जात व वहिवाटीस आहे. सदर मिळकतीबाबत उरण येथील दिवाणी न्यायालय क.स्तर ह्यांचे न्यायालयात दावा क्र.६०/२०१८ हा चालू असून आज रोजी सदरचा दावा प्रलंबित आहे. सदर मिळकतीमध्ये माझे अशिलांचा हिस्सा असल्या कारणाने सदरहू सर्वश्री कै.गजानन काशिनाथ पाटील यांचे वारस १) विजय गजानन पाटील, २) प्रकाश गजानन पाटील, ३) राजेंद्र गजानन पाटील, ४) मदन गजानन पाटील, ५) गणेश गजानन पाटील व ६) वसंत काशिनाथ पाटील यांचे बरोबर सदरहू वर नमूद मिळकतीबाबत कोणीही कसलाही व्यवहार करू नये व असा व्यवहार झाल्याचे आढळून आल्यास व्यवहार करणारा होणाऱ्या परिणामांना सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

उरण
दि.२९/१२/२०२२

सही/-
**ॲड.कुंदन ना. मुंबईकर**
**पत्ता : वेश्वी, ता.उरण, जि.रायगड**

# माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीत ई-रिक्षाच्या समर्थकांनाच जाहीर पाठींबा देणार : दिलीपशेठ गुप्ता

**दै.रायगड नगरी । माथेरान**

जग एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत असताना माथेरान सारख्या अतिदुर्गम भागात आजही जुन्या परंपरा आणि जी काही मालाची अथवा पर्यटकांची वाहतूक व्यवस्था सुरू आहे.त्यात एवढ्या वर्षात बदल झाला नव्हता तो नक्कीच आगामी काळात ई रिक्षा सारख्या वाहनांच्या माध्यमातून पूर्णत्वास जाण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसू लागली आहेत. सुप्रीम कोर्टाने ई रिक्षा सुरू होण्यासाठी सध्या जी काही प्रायोगिक तत्त्वावर ई रिक्षा सुरू झाली आहे त्यामुळे नक्कीच पुढील काळात या गावाचे नंदनवन होणार असून येणाऱ्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत मी आणि माझे असंख्य कार्यकर्ते ई रिक्षाच्या समर्थनार्थ जाहीर पाठिंबा देऊन सक्षम उमेदवार निवडून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार आहोत असे माजी नगराध्यक्ष दिलीपशेठ गुप्ता यांनी सांगितले आहे. ई रिक्षाचे सुप्रीम कोर्टातील याचिकाकर्ते निवृत्त शिक्षक सुनील शिंदे,हात रिक्षा संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश सुतार यांनी दिलीप गुप्ता यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली त्यावेळी त्यांनी स्पष्ट केले.



गुप्ता पुढे म्हणाले की, या गावाला विकसनशील बनविण्यासाठी त्याचप्रमाणे खऱ्या अर्थाने विकासाची गंगा आणण्यासाठी जुन्या रूढींना आणि ज्या बाबींचा अक्षरशः कंटाळा आला आहे त्यामध्ये बदल, परिवर्तन झाल्याशिवाय ह्या गावाची सुधारणा होणार नाही भले परिवर्तन हे कधीच त्रासदायक नसते परंतु परिवर्तनामुळे होणारा विरोध हाच मुख्यत्वे त्रासदायक असतो. त्यामुळे सध्यातरी आपल्या माथेरानने ई रिक्षा सारख्या महत्वपूर्ण प्रकल्पाच्या माध्यमातून एक पाऊल विकासाच्या दिशेने टाकले आहे यामुळे खरोखरच मनोमन आनंद होत आहे. यापूर्वी सुध्दा आम्ही असे वाहतूक व्यवस्थेचा गावात बदल होण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यावेळेस अनिल तावडे, छोटुभाई खान, बबनशेठ पाटील असंख्य स्थानिक व व्यापारी यांनी तीन दिवस दुकाने बंद ठेवून पाठिंबा दिला होता परंतु त्यास यश आले नव्हते. त्यामुळे आता जे काही ई रिक्षाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांची दूरवर शाळेत जाताना होणारी पायपीट, जेष्ठ पर्यटकांना त्याचप्रमाणे रुग्णांना, नागरिकांना या ई रिक्षाच्या व्यवस्थेमुळे न्याय मिळाला आहे. आज जेष्ठ पर्यटकांची संख्या याच ई- रिक्षाच्या मुळे वाढली आहे आणि भविष्यात आणखीन वाढणार आहे यात शंकाच नाही. माथेरान ची जनता पालिका निवडणुकीत ई रिक्षा समर्थक पॅनलच्या बाजूनी ठाम पणे उभी राहील अशी अपेक्षा आहे. गावाच्या व पुढील पिढीचा विचार करण्याची हीच वेळ आहे. जर गावात परिवर्तन झाले तर इथे आपसूकच पर्यटकांची संख्या वाढून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. बेरोजगारी संपुष्टात येईल आणि माथेरान मधील प्रत्येक नागरिक असो किंवा सुशिक्षित बेरोजगार युवक असोत ई रिक्षा मुळे सुशिक्षित बेरोजगार तरुण या व्यवसायात आपल्या कुटुंबातील सदस्यांना आधार देऊ शकतात. आणि विशेष म्हणजे येणाऱ्या पर्यटकांना फिरण्यासाठी आपल्या आवडीनुसार वाहतुकीची साधने उपलब्ध आहेत. त्यामुळे या होत असलेल्या परिवर्तनाचा सर्वांना स्वीकार करावा लागणार आहे. जेवढा विरोध होईल तितक्या जोमाने ही सेवा पर्यटकांना उप-लब्ध करून देण्यासाठी शासन आपल्या परीने पाऊल उचलेल असा विश्वास दिलीपसेठ गुप्ता यांनी व्यक्त केला.

मा.सर्वोच्च न्यायालयाने ई रिक्षाच्या पायलट प्रोजेक्ट साठीच्या आदेशात कुठेही अटी व शर्ती लादलेल्या नाहीत.कोर्टात चाळीस मिनिटे युक्तिवाद झाला न्यायाधीशांनी राज्य सरकार च्या वकिलांना विचारले की, माथेरानला ई-रिक्षा सुरू करण्यासाठी सरकारने काय तयारी केली आहे तेव्हा वकील राहुल चिटणीस यांनी सांगितले की,माथेरानच्या प्रचंड चढ उताराच्या रस्त्यावर कोणत्या कंपनीची ई रिक्षा चालू शकते याची चाचपणी करण्यासाठी तीन महिन्यांच्या पायलट प्रोजेक्टची मागणी केली. वाहतूक ही एक अत्यावश्यक सेवेत मोडते आर टी ओ च्या नियमानुसार चोवीस तास सेवा सुरू राहू शकते पायलट प्रोजेक्टची वेळ सनियंत्रण समितीने व पालिकेने लोकांच्या सोयीनुसार निश्चित केले आहेत व यात बदल करण्याचा अधिकार त्यांचाच आहे ई रिक्षा हा न्यायप्रविष्ट विषय असल्याने ज्या कोणाचाही आक्षेप असेल त्यांनी कोर्टात दाद मागणे हाच एकमेव पर्याय उरलेला आहे.

**सुनिल शिंदे, याचिकाकर्ते माथेरान**

# रोहा तालुक्यात गुरे चोरीच्या प्रमाणात वाढ; दाट धुक्याचा फायदा घेत गुरांची चोरी

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यात मोकाट फिरणाऱ्या गुरांना गुंगीचे औषध देऊन त्यांना बेशुद्ध करून गाडीतून या गुरांची चोरी करणारी टोळी पुन्हा एकदा सक्रीय झाल्याचे समोर आले आहे. पहाटे पसरणाऱ्या दाट धुक्याचा फायदा घेत गुरांची चोरी करण्याच्या प्रकार नुकताच समोर आला असून जागृत नागरिकांनी ओरड केल्याने चोरटे पळून गेले. याघटनेने शेतकरी वर्गात घबराटीचे वातावरण पसरले आहे.

तालुक्यात गुरे चोरीच्या प्रमाणात पुन्हा एकदा वाढ होताना दिसत आहे. ख्रिसमस च्या सकाळी चार वाजण्याच्या सुमारास रोहा शहरातील नवरत्न हॉटेल समोर एक गाय मोठ्याने हांबरडे फोडत असल्याचे जवळच राहत असलेल्या कुंदन पडवळ या जागृत रहिवाश्यानी पाहिले. आणि त्यांनी हे पाहण्यासाठी रस्ता ओलांडत असताना एक पांढऱ्या रंगाच्या एक्सयुव्ही कारमध्ये गाईला भरतानाचे चित्र दिसले. पडवळ यांनी चोरट्यांना आवाज दिला असता कसेबसे चोरटे गाईला रोडवर ढकलत पळून गेले. त्यांच्या गाडीतून पडलेल्या गाईला इंजेक्शन दिले असल्याने ती गाय निपचीत पडली होती.

सकाळी पोलिसांना खबर देईपर्यंत चोरटे फरार झाले असल्याचे पडवळ यांनी सांगितले. इतक्यात पोलीस हावालदार धायगुडे घटना स्थळी पोहचले असता त्यांनी पडवळ यांना घेऊन कोलाड दिशेकडे चोरट्याना पकडण्यासाठी गेले असता दाट धुक्याचा फायदा घेत चोरटे फरार झाले. रोहा पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरू आहे. संशयीत आढळून आल्यास पोलिसांना कळवावे असे आवाहन पोलिसांनी केले आहे. सकाळच्या सुमारास दाट धुके पडले असल्याने धुक्याचा फायदा घेत चोरट्यानी गुरे चोरीला पुन्हा सुरुवात केली आहे. त्यामुळे पुन्हा नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



# कर्जत नगरपरिषद क्षेत्रातील पाणी पुरवठा आज बंद राहणार

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवर मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याने दुरुस्तीचे काम करण्यासाठी कर्जत नगरपरिषद क्षेत्रात उद्या दि.३० डिसेंबर रोजी पाणीपुरवठा बंद राहणार आहे, तरी नागरिकांनी नगरपरिषदेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.



कर्जत शहरातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, कर्जत नगर परिषद पाणी पुरवठा विभागाच्या ५०० मिली मीटरच्या मुख्य जलवाहिनीवर मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याने आज दि.२९ डिसेंबर रोजी सकाळी नगरपरिषद क्षेत्रात पाणी पुरवठा केल्या नंतर मुख्य जलवाहिनी दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे, नगरपरिषद पाणी पूरवठा अभियंता अभिमन्यू येळवंडे, दयानंद गावंड, विलास गायकवाड, दिलीप लाड, अनिल ठोंबरे याठिकाणी उभे राहून काम करून घेत आहेत,त्यामुळे उद्या दि.३० डिसेंबर रोजी शहरातील पाणीपुरवठा बंद राहणार आहे नगरपरिषदेस सहकार्य करावे असे आवाहन नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी केले आहे.

# उरणमध्ये सरत्या वर्षाला अलविदा आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी तरुणाई सज्ज

**दै.रायगड नगरी । उरण**

सरत्या वर्षाला अलविदा आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी अवघी तरुणाई सज्ज झाली आहे. सरत्या वर्षाला अलविदा करण्याचा दिवस जसजसा जवळ येत आहे. तस-तसे तरुणाईला थर्टी फर्स्ट साजरा करण्याचे वेध लागले आहेत. हा आनंद साजरा करण्यासाठी तरुणाईत अनेक मनसुबे आखले जात आहेत. पार्ट्यांसाठी ढाबे, फार्म हाऊस, हॉटेल्स बुकिंग करण्यासाठी तरुणाईत चांगलीच चढाओढ लागली आहे.

काहींनी नेहमीप्रमाणे समुद्र सफर आणि समुद्र किनारीही पार्ट्यांचे आयोजन करण्याची तयारी सुरू केली आहे. काहींनी तर शेतमळ्यांमध्येच थर्टीफस्टची रात्र साजरा करण्याची सोय केलेली आहे.

यामुळे अनेक ठिकाणी डीजेची धूम असणार आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री तरुणाई मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर येऊन थर्टी फर्स्ट बरोबरच नवीन वर्षांच्या स्वागताचा आनंद साजरा करतात.

दरम्यान नववर्षाचे स्वागत करताना अतिरेक होणार नाही याची नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन शेवा बंदर विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त धनाजी क्षीरसागर यांनी केले आहे.

मद्यप्राशन करून रस्त्याने गोंगाट करणे, नशेत वाहन चालवणे आदी बाबी टाळण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे. पीरवाडी, माणकेश्वर, समुद्र किनाऱ्यावर आणि सागरी परिसरातही चोख बंदोबस्तासाठी बीट मार्शल आणि ठिकठिकाणी पोलिसांची गस्ती पथकं तैनात करण्यात आली आहेत.

सरत्या वर्षाला अलविदा आणि नववर्षाचे स्वागत करताना आयोजित कार्यक्रमासाठी पोलिसांकडून आवश्यक त्या परवानग्या घ्याव्या असे आवाहनही करतानाच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मात्र गुन्हे दाखल करण्यात येतीलअसा कडक इशाराही सहाय्यक पोलिस आयुक्त धनाजी क्षीरसागर यांनी दिला आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.बाळकृष्ण बाळाराम पाटील व इतर रा.शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड यांचे खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेलीशेतजमीन मिळकत त्यांच्या मालकी हक्कातील, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकती आहे. त्या मिळकती संदर्भात पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात दिवाणी दावा दाखल केला आहे व सदर दिवाणी दावा न्यायप्रविष्ठ आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २११ | १/२ | ०-२८-०० | ६.१३ |

वरील वर्णनाची शेतजमीन मिळकतीबाबत मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) पनवेल यांचे कोर्टात रे.मु.नंबर ३३५/२०१९ हा दावा १) श्री.महादेव कमळू पाटील व इतर ९ यांचे विरोधात पनवेल येथील न्यायालयात प्रलंबित असताना देखील दाव्यातील प्रतिवादी १) श्री.महादेव कमळू पाटील व इतर ९ यांनी बेकायदेशीररित्या दावा मिळकत विकण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तसेच सदर जमीन त्यांचे ताबेकब्जात व मालकीत असल्याचे भासवून नैना प्रकल्पामध्ये जमीन समाविष्ट झाल्यानंतर त्या मोबदल्यात मिळणारे भूखंड घेण्याचे प्रयत्नात आहेत. तरी कोणत्याही इसमाने अगर संस्थेने १) श्री.महादेव कमळू पाटील व इतर ९ यांचे बरोबर वरील शेतजमीन मिळकती संदर्भात साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिस पत्र चार्ज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध किंवा वरील मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार करू नये. जर तसे केल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध निर्माण होणार नाही किंवा असा हितसंबंध निर्माण झाल्यास ते बेकायदेशीर हक्क हितसंबंध आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२९/१२/२०२२
स्थळ : पनवेल

सही/-
**ॲड.प्रदीप श. म्हात्रे**
**ॲडव्होकेट्स ॲड लिगल कन्सल्टंटस्, बी/१०४, पहिला मजला, पायोनिअर को. ऑप.हौसिंग सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : जुई, ता.उरण, जि.रायगड येथील खालील नमूद जमीन मिळकतीबाबत माझे अशिल श्री.प्रशांत चाया पाटील, श्रीमती.रेणुका चाया पाटील, हर्षदा चाया पाटील रा.मोठी जुई, ता.उरण, जि.रायगड यांचे ताबेकब्जातील व वहिवाटीतील आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| जुई | १०० | ५० | ०-३३-७० पो.ख. ०-०४-८० | ३.५० |
| जुई | १०० | ३७ | ०-०८-०० पो.ख. ०-०१-०० | ०.८४ |
| जुई | १०० | ११ | ०-१८-०० पो.ख. ०-०२-८० | १.८७ |
| जुई | १४४ | ५ | एकूण क्षेत्र १-२८-३० | २०.०० |
| जुई | १०३ | १३ | ०-३५-५० पो.ख. ०-००-०० | ३.४४ |

वरील नमूद मिळकत ही सातबारा सदरी १) कमळूबाई विष्णू भोईर, २) प्रमिला दिलीप पाटील, ३) रजनी चाया पाटील ह्यांचे नावाची सदरहू मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईटमध्ये नावे मालक सदरी असल्याचा गैरफायदा घेवून सदरहू वर नमूद मिळकती त्रयस्थ इसमांना विकून टाकण्याच्या प्रयत्नात आहेत. अगर अन्य मार्गानी तबदील करण्याच्या प्रयत्नात आहेत. असे वर नमूद माझे अशिलांना खात्रीने आढळून आलेले आहे. तरी तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरहू वर नमूद जमीन मिळकत ही वडिलोपार्जित मिळकत असून माझे अशिल श्री.प्रशांत चाया पाटील, श्रीमती.रेणुका चाया पाटील, हर्षदा चाया पाटील रा.मोठी जुई, ता.उरण, जि.रायगड ह्यांचे मालकी हक्कात, ताबेकब्जात व वहिवाटीस आहे. सदर मिळकतीबाबत मे. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार उरण ह्यांचे न्यायालयात दिवाणी दावा चालू असून आज रोजी सदरचा दाव प्रलंबित आहे. सदर मिळकतीमध्ये माझे अशिलांचा हिस्सा असल्या कारणाने सदरहू सर्व १) कमळूबाई विष्णू भोईर, २) प्रमिला दिलीप पाटील, ३) रजनी चाया पाटील यांचे बरोबर सदरहू वर नमूद मिळकतीबाबत कोणीही कसलाही व्यवहार करू नये व असा व्यवहार झाल्याचे आढळून आल्यास व्यवहार करणारा होणाऱ्या परिणामांना सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

उरण
दि.२९/१२/२०२२

सही/-
**ॲड.कुंदन ना. मुंबईकर**
**पत्ता : वेश्वी, ता.उरण, जि.रायगड**

Hon'ble Mujawar Court
Adv.Dnyaneshwar S. Kulkarni
Applicant Advocate

### PUBLICE NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION, AT PANVEL
CIVIL M.A.NO. 1877 OF 2022
Exh No.8/D
Next Date : 03/02/2023

1) Jagdamba Umashankar Pancharia
Aged 60 Years, Occupation : Retired Teacher
Residing at : B-1/2, Plot No.15
New Panvel, Tal-Panvel,
Dist-Raigad, Pin-410206 Applicant

V/s

1) Vajra Umashankar Pancharia
Aged 35 Years, Occupation : Animation
2) Vinamra Umashankar Pancharia
Aged 33 Years, Occupation : Filmmaking
Both having address at : B.A.R.C. Colony,
14 Kalyani, Anushakti Nagar,
Mumbai-400094 Respondents

All the Public is informed by this notice inform that, Late. Umashankar Jeevandutt Panchaira died at B.A.R.C. Colony, 14 Kalyani, Anushakti Nagar, Mumbai-400094 on 06/02/2021 and Jagadmaba Umashankar Pancharia filed an application for obtaining Heirship Certificate in respect of below maintined Property of Late. Umashankar Jeevandutt Panchaira

B-1/2, Plot No.15, Rajput CHS, Sector-15 A, New Panvel, Tal-Panvel, Dist-Raigad, Pin-410206 (Flat area 66.33 Sq. Mtrs).

The above mention property was owned by Late. Umashankar Jeevandutt Panchaira and Jagdamba Umashankar Pancharia is legal heir of Late. Umashankar Jeevandutt Panchaira. If any person has any objection to her rights in the above said property. He/She must appear with the quota within one month. If appropriate objection is not taken during this time. The court will take immediate action to obtain evidence for Jagdamba Umashankar Panchaira rights, and if she proves that she is entitled as legal Heir of Late. Umashankar Jeevandutt Panchaira the Heirship certificate shall be issued in favour of Applicant.

Date 29/12/2023 On the day I game my sign and Court Stamp.

Sd/-
Jr.Clerk
Hon Court S.D.
Panvel

Court Seal

Sd/-
Asst.Superitent
Hon Court S.D.
Panvel

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या नराधम वॉचमनला जन्मठेप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील सदाशिव बिल्डींग मधील एका मॅडमकडे घरकाम आहे असे सांगुन नोंदवही दाखविण्याचा बहाणा करून फिर्यादीस बोलण्यामध्ये गुंतवुन ठेवून तिची दिशाभुल करून फिर्यादीचे सोबत असणारी तिची अल्पवयीन मुलगी वय वर्षे ५, हिस बिल्डींग मधील वॉचमन रूम मध्ये नेवून तिच्यावर दोन नराधामांनी आळीपाळीने लैंगिक अत्याचार केले आणि सदर बाबत तिने कोणास सांगु नये या करीता तिला मारहाण करून दमदाटी केली या बाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला होता. सदर खटल्यामध्ये पनवेल येथील सत्र न्यायालयाने आरोपीस जन्मठेप आणि रक्कम रू. ५०,०००/– ( अक्षरी रक्कम रू. पन्नास हजार मात्र) दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

पनवेल शहरातील पाच वर्षीय पिडीत मुलगी तिचे आईसोबत सदाशिव बिल्डींग, टिळक रोड, पनवेल या बिल्डींग समोरून जात असताना सदर बिल्डींगचे वॉचमन शिवमढी पांडे आणि श्रीकांत पांडे यांनी पिडीतेचे आईला बिल्डींगचे गेटचे आत बोलावून घेतले आणि बिल्डींग मधील एका मॅडमकडे घरकाम आहे असे सांगुन नोंदवही दाखविण्याचा बहाणा करून फिर्यादीस बोलण्यामध्ये गुंतवुन ठेवून तिची दिशाभुल करून फिर्यादीचे सोबत असणारी तिची अल्पवयीन मुलगी वय वर्षे ५, हिस बिल्डींग मधील वॉचमन रूममध्ये नेवून तिच्यावर दोन नराधामांनी आळीपाळीने त्या लहान बालिकेवर लैंगिक अत्याचार केले आणि सदर बाबत तिने कोणास सांगु नये या करीता तिला मारहाण करून दमदाटी केली. त्यानंतर पिडीतेने सदरचा प्रकार आईला सांगितला आणि त्यानुसार पनवेल शहर पोलीस ठाणे येथे फिर्याद नोंद झाली आणि वॉचमन शिवमढी पांडे व श्रीकांत पांडे यांचेवर गुन्हा दाखल झाला. पनवेल शहर पोलीस ठाणे यांनी सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून दोन्ही आरोपींविरूध्द दोषारोपपत्र मा. सत्र न्यायालयात दाखल केले. सदर खटल्याची सुनावणी अति. सह जिल्हा व अति सह सत्र न्यायाधीश, पनवेल, श्रीमती शाइदा शेख यांचे न्यायालयात झाली. याप्रकरणात पिडीत मुलगी, तिची आई, पंच आणि तपासिक अधिकारी यांची साक्ष महत्वाची ठरली. सदर दोन आरोपींपैकी वॉचमन श्रीकांत पांडे याचा तुरूंगातच मृत्यु झाला होता. सदर खटल्यामध्ये अति शासकीय अभियोक्ता, ॲड. प्रतिक्षा वडे – वारंगे यांनी अभियोग पक्षातर्फे काम पाहीले.

सदर केसच्या सुनावणी दरम्यान पैरवी अधिकारी विद्या भगत, वरिष्ठ पोलीस निरिक्षक विजय कादबाने यांनी सहकार्य केले. सरकार पक्षातर्फे अति शासकीय अभियोक्ता, ॲड. प्रतिक्षा वडे – वारंगे यांनी मा. न्यायालयासमोर केलेला युक्तीवाद आणि दाखल केलेले न्यायनिर्णय ग्राहय धरून न्यायालयाने आरोपी वॉचमन शिवमढी पांडे, वय. २५ वर्षे यास भा.द.वि. कलम ३७६ ड, ३२३, ५०६ तसेच पोक्सो कलम कायदा ३,४,५ (जी), ६ अन्वये जन्म ठेपेची व ५० हजार रूपयांचा दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. सदर दंडाच्या रक्कमेपैकी रक्कम रूपये २५,०००/– (रक्कम रूपये पंचवीस हजार मात्र) पिडीत मुलीस देण्यास मा. न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. सदर खटल्याच्या निकालाकडे पनवेल परिसरातील लोकांचे लक्ष लागून राहीलेले होते. मा. न्यायालयाने आरोपीला दिलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेमुळे यापुढे लहान मुलांवर अत्याचार करणाऱ्या निच प्रवृत्तीच्या लोकांना चांगलीच जरब बसलेली आहे. या न्यायनिर्णयामुळे समाजातील सर्व स्तरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त...

### पडघे गाव परिसरातून केला देशी दारूचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील पडघे गाव परिसरातून तळोजा पोलिसांनी देशी दारूचा साठा हस्तगत केला आहे.

येथील गावदेवी पाडा एका घराच्या आडोशाला बेकायदेशीररित्या देशी दारूचा साठा केल्याची माहिती तळोजा पोलिसाना मिळताच त्याच्या विशेष पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून त्या ठिकाणावरून ३७ देशी दारूच्या बाटल्या ज्याची किंमत जवळपास १७५०/– रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असून याबाबत अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अनंत लांब करीत आहेत.

### महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून दोघेजण पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रिक्षात बसलेल्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून दोघेजण मोटारसायकलवरून पसार झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

वासंती विजय कदम ( वय ५८ ) रा. करंजाडे या त्यांचे पती व सुने सोबत औषधे घेण्यासाठी रिक्षातून शहरातील वेलनेस मेडिकल येथे थांबल्या होत्या या वेळी दोन इसम मोटारसायकलीवरून तेथे आले व रिक्षा चालकास पत्ता विचारण्याच्या बहाण्याने तेथे थांबून त्यापैकी मागे बसलेल्या एकाने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र ज्याची किंमत जवळपास ५५.००० /– रुपये इतकी आहे ते खेचून मोटारसायकलवरून पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## साई गाव ते कर्नाळा नाका रस्त्याची दुरवस्था

**दै.रायगड नगरी । उरण**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे साई गाव ते कर्नाळा नाका रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामुळे रात्री अपरात्री वाहणांना अपघाताना सामोरे जावे लागत आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी अपघातात जीवित हानी होण्याची वाट न बघता सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्तीचे काम हाती घ्यावे अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.



गव्हाण फाटा ते चिरनेर आणि चिरनेर ते कर्नाळा नाका या रस्त्याचे नव्याने डांबरीकरण, काँक्रीटकरण व रुंदीकरण करण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने २०२० ते २०२१ या वर्षी करोडो रुपये खर्च करून हाती घेतले आहे. परंतु साई गाव ते कर्नाळा नाका या रस्त्याची पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असून मोठं मोठे खड्डे पडले आहेत. सदर रस्त्याचा वापर हा उरण, नवीमुंबई, मुंबई, ठाणे आणि पेण, अलिबाग, कोकण तसेच गोवा या ठिकाणी ये– जा करणारे हजारो पर्यटक, चाकरमानी करत आहेत. त्यामुळे रात्री अपरात्री प्रवास करणाऱ्या वाहणांना सदर रस्त्यावरील खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने वारंवार अपघाताची संख्या बळावली आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी साई गाव ते कर्नाळा नाका रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांवर अपघात होऊन जीवितहानी होण्याची वाट न पाहता, सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## नववर्षाचे स्वागत करतांना कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्या : पंकज डहाणे

**दै.रायगड नगरी । पनवेल**



नववर्षाचे स्वागत करतांना सर्व नागरिकांनी कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन परिमंडळ – २ चे पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी केले आहे.

नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक जण पनवेल परिसरातील हॉटेल, ढाबे, फार्महाऊस, खासगी बंगल्यांना पार्टीच्या आयोजनासाठी पसंती देत आहेत. तालुक्यातील अनेक फार्महाऊस आणि बंगले बुक करण्यात आली आहे. परंतु या सर्व घडामोडींवर करडी नजर पोलिसांची आहे. उत्साहात कोणताही नियमबाह्य तसेच अनुचित प्रकार सहन केला जाणार नाही, असा इशारा पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी दिला असून ठीक ठिकाणी नाका बंदी, ड्रंक अँड ड्राइव्ह केसेस केल्या जाणार आहेत. अमली पदार्थाची वाहतूक व सेवन करणे या विरोधात सुद्धा कारवाई केली जाणार आहे. तरी प्रत्येकाने काळजी घेऊन कायद्याचे उल्लंघन न करता सरत्या वर्षाला निरोप व नववर्षाचे स्वागत करावे असे आवाहन पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी केले आहे.

## आ.बाळाराम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर

### जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेतर्फे आरोग्य सेवेचा उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोकण शिक्षक मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आ.बाळाराम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवार २८ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी २.०० वाजता, देवी अंबा माता मंदिर से.१३, खांदा कॉलनी येथे जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या पुढाकाराने आणि सुश्रुषा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या माध्यमातून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शिबिरात ब्लड प्रेशर, टेम्परेचर, ई.सी.जी., ऑक्सिजन लेवल, एस पी ओ २, सी.बी.सी / क्रियाटीन इत्यादी चे मोफत तपासणी करण्यात आली. आवश्यक वाटल्यास डॉक्टरांच्या सल्लयाने माफक दरात हार्ट सोनोग्राफी, कार्डिओग्राफिक यांचेही तपासणी करण्यात आली. तसेच पिवळे आणि केशरी रेशनकार्ड धारकांसाठी ऍन्जोग्राफी शासकीय योजनेच्या माध्यमातून मोफत करण्याचे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी पनवेलचे आदर्श मा.नगराध्यक्ष




जे. एम. म्हात्रे यांनी स्वतः उपस्थित राहून ज्येष्ठ नागरिकांसोबत स्वतःही आपली आरोग्य तपासणी करून घेतली. जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितमदादा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर यशस्वीरीत्या राबवण्यात आले

गुरुवार दिनांक २९/१२/२०२२ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, पनवेल एसटी डेपो जवळ या ठिकाणी अशाच प्रकारे शिबिराचे आयोजन सकाळी दहा वाजता करण्यात आले आहे. नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या वतीने करण्यात आले.

## लव्ह जिहादच्या पार्श्वभूमीवर नागोठणे बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

वाढता लव्ह जिहाद रोखण्यासाठी व धर्मांतरण बंदी कायदा लवकरात लवकर आणण्यासाठी तसेच वारंवार हिंदू भगिनींवर होणारे अत्याचार व हत्या रोखण्यासाठी सकल हिंदू समाज नागोठणे पंचक्रोशी यांच्या वतीने बुधवार दि. २८ डिसेंबर रोजी नागोठणे बंदचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला नागोठ्यातील सर्व दुकानदार व व्यावसायिकांनी पाठिंबा दर्शवत पूर्ण दिवसभर शंभर टक्के बंद ठेवण्यात आला.



सततचे धर्मांतरण आणि लव्ह जिहादच्या माध्यमातून हिंदू महिलांची होणारी हत्या तसेच लव्ह जिहाद प्रकरणातून नुकत्याच झालेल्या मुरुड येथील व्यापारी चंदन जैन यांच्या हत्येतील मुख्य आरोपी नागोठणे येथील रहिवासी मंजर मोहम्मदअली जुईकर हा मोकाट फिरत आहे. त्याला तात्काळ अटक करण्यात यावी तसेच त्याला कटोरातील कठोर शिक्षा करण्यात यावी अशी मागणी संदर्भात तसेच या संपूर्ण घटनेच्या निषेधार्थ बुधवार दि.२८ रोजी सकल हिंदू समाज नागोठणे पंचक्रोशी यांच्या वतीने नागोठणे बंदची हाक देण्यात आली होती. सकल हिंदू समाजाच्या या हाकेला नागोठणे येथील सर्व दुकानदार व व्यावसायिकांनी प्रतिसाद देत संपूर्ण दिवसभर आपली दुकाने बंद ठेवून या बंदला १०० टक्के पाठिंबा दर्शविला. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यादरम्यान रोहाचे पोलीस उपअधिक्षक किरणकुमार सुर्यवंशी यांनी नागोठणे येथे भेट देवून परिस्थितीचा आढावा घेतला.

## आधुनिक उपकरणांपेक्षा जीव महत्वाचा : नवी मुंबईची रणरागिणी अपर्णा शहा यांचे आवाहन

### महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी हस्ते अपर्णा शहा यांचा गौरव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जगभरात सध्या इंटरनेटचे जाळे पसरलेले आहे या आधुनिक युगात आधुनिक साधनांचा वापर तितकाच आवर्जून केला जात आहे. स्मार्टफोन, स्मार्ट एलईडी टीव्ही, कम्प्युटर , लॅपटॉप सह इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे आपल्या दैनंदिन जीवनात आपण वापरत असतो, मात्र आपल्या नकळत ही उपकरणे आपल्या आरोग्यावर बेतू शकतात व यापासून आपल्या शरीरिक तसेच मानसिक आजारांना निमंत्रण मिळू याचेच गांभीर्य लक्षात घेऊन याबाबत जनजागृती सुरु झालेली आहे.




देशातील जिल्हे , तालुके यांच्या नंतर आता नवीमुंबईत देखील या गंभीर समस्ये बाबत जनजागृती सुरू करण्यात आली आहे नवी मुंबई शहरात याबाबत आता चळवळ उभी राहिली आहे. वर्ड डिजिटलटल डेक्टोक्स दिनाच्या निमित्त ही जनजागृती संस्थापक रेखा चौधरी यांच्या संकल्पनेतून उदयास आल्या नंतर मोठ्या प्रमाणात महिला रणरागिण्या या चळवळीत उतरलेल्या आहेत.



नवी मुंबईतील अशीच एक रणरागिनी असलेल्य भावना ग्रुपच्या चेअरमन तसेच वर्ड डिजिटलटल डेक्टोक्स च्या ब्रँड अँबेसिडर अपर्णा शहा यांनी देखील या आधुनिक डिजिटल चळवळीच्या विरोधात नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतला असून आपल्या मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर संपूर्ण नवी मुंबईकरांना अभिमान वाटेल अशी कामगिरी सुरू केलेली आहे.

राजभवन मुंबई याा ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोशारी यांच्या हस्ते अपर्णा शहा यांच्या कामाची दखल घेऊन त्यांचा नुकताच गौरव करण्यात आला. यावेळी रेखा चौधरी, अर्चना नेवरेकर, मंजू लोढा, अनिता चौधरी, वंदना चौधरी उपस्थित होत्या. डिजिटल साधनांपासून दूर राहून आपल्या आरोग्याला कसे सांभाळावे याचे धडे सध्या अपर्णा शहा विविध माध्यमातून जनतेसमोर ठेवत आहे. आतापर्यंत मोबाईल तसेच डिजिटल उपकरणांच्या अति वापरामुळे शारीरिक, मानसिक आजार, अनिद्रा, रक्तदाबाच्या उद्भवणाऱ्या समस्या, शरीरामध्ये साखरेचे वाढणारे प्रमाण व सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपुलकीच्या माणसांबद्दल या डिजिटल उपकरणांच्या अधिक वापरामुळे हरवत चाललेला जिव्हाळा अशा गंभीर विषयांवर प्रकाश टाकण्यासाठी नवी मुंबईची रणरागिणी अपर्णा शहा या सामाजिक चळवळीतून आपले काम करत आहेत यांच्या कामाचे कौतुक अनेक स्तरावरून केले जात असून एका महिलेने उचललेले हे जबाबदारीचे धनुष्यबाण असेच अखंड पेलवत राहावे असे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

## लिमये वाचनालयाचा वर्धापन दिन उत्साहात; रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाचा अमृत महोत्सवी वर्धापन दिन सोहळा बुधवारी (दि. २९) उत्साहात साजरा झाला. या सोहळ्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या वेळी त्यांनी संस्थेच्या नवीन वस्तूसाठी भरघोस मदत करणार असल्याचे आश्वासन दिले.

पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात झालेल्या वर्धापन दिन सोहळ्यास उद्योजक जे. एम. म्हात्रे, ग्रंथालय संचालनालयाच्या सहसंचालक शालिनी इंगवले, संस्थेच्या अध्यक्ष सुनिता जोशी, सचिव काशिनाथ जाधव, ॲड. माधुरी थळकर यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्धापन दिनानिमित्त ग्रंथालयात श्री सत्यनारायणाच्या महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महापूजेचे दर्शन घेऊन संपूर्ण ग्रंथालयाची पाहणी केली व सद्यस्थितीची माहिती घेतली

